नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०७/११/२०२६ (शनिवार)

विद्युत वाहिनी ॲल्युमिनीयम तार चोरीचा गुन्हा उघड, आरोपी अटक
९० हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त
खापा पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन खापा :– **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री सागर खर्डे सहा. पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री चंद्रकांत काळे, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन खापा नागपुर ग्रामीण यांच्या नेतृत्वात दिनांक ०६/११/२०२६ रोजी खापा पोलीसांनी कोदेगाव परिसरातील विद्युत वाहिनी ॲल्युमिनीयम तार चोरीचा गुन्हा उघड करून ९०,०००/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

फिर्यादी नामे जितेंद्र छत्रु जांभुळकर, वय ३६ वर्ष, रा. कनिष्ठ अभियंता सावनेर ग्रामीण यांनी तक्रार दिली की, दिनांक ०५/११/२०२६ रोजी कोदेगाव परिसरातील शेतकरी श्री. ईशान भद्रे व श्री. मधुकर सुरजुसे यांच्या शेतातील लघुदाब विद्युत वाहिनीचे ॲल्युमिनियमचे ३ पोलवरील ७२० मीटर लांबीचे तार एकुण किंमती ४०,०००/– रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेले. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन खापा येथे कलम १३६, १३९ भारतीय विद्युत अधिनियम (सुधारणा) २००३ अन्वये चोरीचा गुन्हा नोंद केला.

पोलीस स्टेशन खापा येथील तपास पथकाने सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान दिनांक ०६/११/२०२६ रोजी तांत्रिक पुरावे व गुप्त माहितीच्या आधारे सदर गुन्ह्यात **आरोपी नामे शंकर रामा वाघूके, वय ५१ वर्ष, रा. किरणापूर, ह. रा. मताखेडी खापा c/o गोपाल पालेकर यांचे घरी भाड्याने** यास निष्पन्न करून त्यास ताब्यात घेतले. नमुद आरोपीकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यानी पोलीस स्टेशन खापा परिसरात विद्युत वाहिनीचे ॲल्युमिनियमचे तार चोरीचा गुन्हा केल्याचे कबुल केले.

पोलीसांनी पंचासमक्ष ०१ मोटरसायकल किंमती ५०,०००/— रुपये, व गाडीचे डिक्कीत चोरी केलेली ॲल्यूमीनियम इलेक्ट्रिक तार तुकडे केलेली अंदाजे ७०० मीटर किंमती ४०,०००/— रुपये, ईतर साहित्य असा एकुण ९०,०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. वर नमुद आरोपीस अटक करण्यात आले असुन पुढील तपास खापा पोलीस करीत आहे.

अवैधरित्या धारदार शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद उमरेड पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन उमरेड :— दिनांक ०६/११/२०२६ रोजी उमरेड पोलीसांना गोपनिय माहीती मिळाली की, मौजा मांडवा येथे आरोपी लक्ष्मन पांडुरंग चव्हान हा सार्वजनिक ठिकाणी हातात लोखंडी धारदार चाकु घेवुन फिरत आहे. त्यामुळे लोकांच्या मनात भिती निर्माण झाली आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पंचासह नमुद ठिकाणी जावुन पाहणी केली असता एक इसम त्याचे हातात लोखंडी धारदार चाकु दिसुन आला. त्याला नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव लक्ष्मन पांडुरंग चव्हान, वय ४० वर्ष, रा. मांडवा, ता. उमरेड असे सांगितले. तसेच पोलीसांनी पंचासमक्ष नमुद आरोपीची अंगझडती घेतली असता त्याचे जवळ एक लोखंडी धारदार चाकु मिळुन आला. सदर लोखंडी धारदार चाकु प्राणघातक शस्त्र बाळगण्या बाबत परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याचे जवळ कोणताही परवाना नसल्याची माहीती प्राप्त झाली.

पोलीसांनी पंचासमक्ष एक लोखंडी धारदार चाकु किंमती २००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद प्रकरणी आरोपीविरूद्ध पोस्टे उमरेड येथे कलम ४/२५ शस्त्र अधिनियम, सहकलम शत्रु संपत्ती अधिनियम १३५, ३७(१) महाराष्ट्र पोलिस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

कोदेगाव परिसरातील विद्युत तार चोरी प्रकरणाचा नागपूर ग्रामीण पोलिसांकडून छडा आरोपी अटकेत

कोदेगाव परिसरात शेतकऱ्यांच्या शेताकडे जाणाऱ्या विद्युत वाहिनीच्या तारा चोरी झाल्याबाबत दिनांक ०६/११/२०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या वृत्ताच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, सदर प्रकरणाची नागपूर ग्रामीण पोलिसांनी गांभीर्याने दखल घेतली आहे. या प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून, पोलिसांनी तपासाची चक्रे गतिमान करून प्रकरणातील **आरोपी नामे शंकर रामा वाघूके, वय ५१ वर्ष, रा. किरणापूर, ह. रा. मताखेडी खापा c/o गोपाल पालेकर यांचे घरी भाड्याने** याला दिनांक ०६/११/२०२६ रोजी अटक केली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरू असून, या प्रकरणातील इतर बाबींचा तपास करण्यात येत आहे. नागपूर

ग्रामीण पोलीस दलाकडून नागरिकांच्या मालमत्तेविरुद्ध होणाऱ्या गुन्ह्यांची गांभीर्याने दखल घेण्यात येत असून, अशा गुन्ह्यांमध्ये तातडीने कायदेशीर कारवाई करण्यात येते.

अवैध दारू विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर ०७ गुन्हे दाखल

दिनांक ०६/११/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची विक्री, दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ०७ गुन्हे दाखल केले.

पोलीस स्टेशन मोहपा येथे आरोपी नामे संतोष धनराज झाडे, वय ३९ वर्ष, रा. वार्ड क्र. ०२, कोहळी ता. कळमेश्वर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे १) रुपेश दिवाकर सरवरे, वय ३५ वर्ष, रा. दातेवाडी, ता. नरखेड, जि. नागपुर २) नरेंद्र लक्ष्मण सातपूते, वय ४० वर्ष, रा. मेढंला, ता. नरखेड, जि. नागपुर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे धमेंद्र दिलीप पाटील, वय ३८ वर्ष, रा. नायगाव चिचाळा, ता. काटोल याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे थिमराव बापुराव गजघाटे, रा. एम आय डी सी उमरेड याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार** येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वडोदा** येथे निकेश शंकर राउत, वय ३० वर्ष, रा. सावळी, ता. कामठी, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद.

नमुद कारवाईत एकुण ५९४० मिली देशी दारू, १० मोहाफुल दारू असा एकुण ३६४०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ६६६ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०७/११/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २४ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६६६ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

नागपुर उपविभाग :– नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे २९ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे २९ आरोपी अशा एकुण ८७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

उमरेड उपविभाग :– उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४१ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २४ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे १८ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २५ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १२ आरोपी अशा एकुण १२० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

सावनेर उपविभाग :– सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ४४ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३८ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १६ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन मोहपा येथे १९ आरोपी, अशा एकुण १४८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

कन्हान उपविभाग :– कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे २९ आरोपी, पोलीस स्टेशन मौदा येथे २० आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १८ आरोपी अशा एकुण ६७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

रामटेक उपविभाग :– रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २१ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २७ आरोपी अशा एकुण १११ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

काटोल उपविभाग :– काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४१ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३८ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २६ आरोपी अशा एकुण १३३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.



जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर